तात्काळ/महत्वाचे

क्र/विशा/कार्या ११(४)/कावि 683/06
विभागीय आयुक्तांचे कार्यालय नागपूर.
दिनांक २८ जुन २००६

प्रति,
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा.)
जिल्हा परिषद चंद्रपूर.

विषय :- ग्रामपंचायत कर्मचा-यांना जिल्हा परिषद सेवेतील वर्ग ३ व ४ चे पदावर १० % आरक्षण ठेवणेबाबत.
ग्रामपंचायत कर्मचा-यांची जेष्ठता सुची मंजुरीबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र. पंचायत /टे-७/वय/०६, दि.२०/६/२००६

उपरोक्त विषयावरील संदर्भीय पत्राचे अवलोकन करावे.

वरील पत्रान्वये आपण जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत ग्रामपंचायत कर्मचा-यांची जेष्ठता यादी मंजुरीस्तव या कार्यालयास पाठविली आहे. सदर जेष्ठता यादीमध्ये ज्या कर्मचा-यांची वयाची १८ वर्षे कमी कालावधीत नियुक्ती केली, त्या कर्मचा-यांना वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक हा नियुक्तीचा दिनांक गृहीत धरुन जेष्ठता यादीमध्ये नमूद करावयाचा आहे. परंतु आपण तसे केले नसल्याने पाठविलेली जेष्ठता यादी बरोबर नाही.

तरी आपणांस कळविण्यात येते की, वरील प्रमाणे तातडीने दुरुस्ती करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सुधारीत जेष्ठता यादी मंजुरीस्तव या कार्यालयास तातडीने पाठवावी.

विभागीय आयुक्त
नागपूर करिता.

Scanned by CamScanner